महासागर
अमरावती
शुक्रवार, दि. 25 ऑक्टोंबर 2024



# दोन विद्यमान, एक माजी आमदारांचा उमेदवारी अर्ज दाखल

■ सहा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा श्री गणेशा

■ अमरावती, अचलपूरमध्ये अद्याप एकही अर्ज दाखल नाही





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.24 )-** राज्यातील विधानसभा निवडणूकीकरिता अमरावती जिल्ह्यातील दोन विद्यमान आणि एक माजी आमदारांनी गुरुवारी( दि.24) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आठ पैकी सहा मतदारसंघामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा श्री गणेशा झाला असून अमरावती व अचलपून मतदारसंघामध्ये अजुन एकाही उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज निवडणूक आयोगाकडे दाखल केला नाही.

तिवसा मतदारसंघातील विद्यमान आमदार ॲड.यशोमती ठाकूर यांनी महाविकास आघाडी, धामणगाव रेल्वे मतदारसंघातील विद्यमान आमदार प्रताप अडसड यांनी महायुतीकडून, दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी महायुतीकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

तसेच बडनेरा मध्ये भारतीय युवा जन एकता पार्टी कडून राहुल मोहोड, मेळघाट विधानसभा मतदारसंघात मोतीलाल ठाकरे यांनी बहुजन समाज पक्षाकडून तर मोर्शी विपूल भडांगे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. अमरावती, अचलपूरमध्ये अद्याप एकही अर्ज दाखल नाही हे विशेष.



# उध्दव साहेबांना गाऱ्हाणं घालू, अन् मगचं निर्णय घेवू!

■ झरझर बरसले शिवसैनिकांचे अश्रु ■

■ प्रिती बंड यांच्या समर्थनार्थ एकवटले शिवसैनिक ■

*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती,( दि.24 ) - बडनेरा मतदारसंघात प्रिती बंड यांना उमेदवारी नाकारल्यानंतर बंड समर्थक शिवसैनिकांमध्ये पक्षश्रेष्ठींच्या या निर्णयाविरोधात प्रचंड रोष पहायला मिळत आहे. गुरुवारी( दि.24 ) येथील सुयोग मंगल कार्यालयात बंड समर्थकांनी पुढचा निर्णय घेण्याकरिता एका सभेचे आयोजन केले होते. या सभेत अनेकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त करत काहीही झाले तरी माघार घ्यायची नाही, अशी भूमिका मांडली.*

## आज मातोश्रीवर देणार धडक

प्रिती बंड यांनी सभेला संबोधित करताना कोणताही निर्णय घेण्याअगोदर आपण उध्दव साहेबांसमोर आपले गाऱ्हाणे मांडू आणि त्यानंतरच तुमच्या भावनांवर विचार करु असे आवाहन केले. आपल्या भावना व्यक्त करताना प्रिती बंडसह उपस्थित अनेक शिवसैनिकांच्या डोळ्यातील अश्रु झरझर बरसत होते. आयोजित या सभेमध्ये मंचावर भैय्यासाहेब निर्मळ, नितीन हटवार, नाना नागमोते, संजय शेटे, डॉ.अल्बिना हक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सर्वांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. स्वाती निस्ताने, वंदना थोरात, प्रविण आळसपुरे, आशिष धर्माळे, राहुल माडोळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.






## उध्दव साहेबांच्या अपमानाचा बदला घ्यायचा होता



गेल्या विधानसभा निवडणूकीमध्ये आ.रवी राणा अडीच कोटी रुपयांची बॅग घेवून माझ्या घरी आले होते. तेव्हाही मी विकल्या गेली नाही. कारण हा प्रामाणिकपणा कमवायला आम्ही आमच्या आयुष्यातले 40 वर्ष खर्ची घातले. घरात चटणी भाकर खाईल, पण विकल्या जाणार नाही. कारण घरातून निघताना मला ताट मानेने निघायचे आहे. मी विकल्या गेली असती तर तुमच्या सारखी मंडळी आज माझ्या पाठीमागे उभी नसती. मला लढायचं होते, ज्याने मातोश्रीवर वाईट नजर टाकली, त्याचे पंख छाटायचे होते. उध्दव साहेबांच्या अपमानाचा बदला घ्यायचा होता. मी गरीब आहे, माझ्याकडे पैसे नाही, अश्या कुरघोड्या करुन माझी तिकीट कापण्यात आली. दुपारी 3 वाजेपर्यंत उमेदवारांच्या यादीत माझे नाव असताना संध्याकाळी 6 वाजता मला अचानक उमेदवारी नाकारण्यात आली. तरीही उध्दव साहेबांवर माझा राग नाही. मी उपस्थित सर्वांच्या भावनांचा आदर करते, उध्दवसाहेबांना भेटल्याशिवाय कुठलाही निर्णय घेणार नाही.

## संजय बंड आमचे दैवत

ज्या माणसाने निस्वार्थपणे शिवसेनेची आणि समाजाची सेवा केली, असे संजय बंड आमचे दैवत आहे. बंड कुटूंबियांचे घर आमच्या हक्काचे घर आहे. उमेदवारीकरिता वशिलेबाजी करणाऱ्यांची पार्श्वभूमि तपासणे गरजेचे आहे. हा उमेदवार विरोधकांनी विकत घेतला आहे, हे तेवढेच स्पष्ट आहे. हा आमच्यासारख्या निष्ठावान शिवसैनिकांवर अन्याय आहे.

**भैययासाहेब निर्मळ,**
**संचालक कृउबा.**

## मग त्या 40 लोकांचे काय चुकले?

शिवसेना मोठी करण्याकरिता शिवसैनिकांनी गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या रक्ताचे पाणी केले. शिवसेनेनेही आम्हाला खूप काही दिले. त्यामूळे आजन्म निष्ठेने शिवसैनिक रहायचे हे आम्ही ठरवले आहे. परंतू आमच्या निष्ठेला येथे सन्मान मिळत नसेल तर आम्ही काय करायचे, रातोरात असा घात होत असेल तर त्या 40 जणांचे काय चुकले ज्यांनी वेगळी चुल मांडली, असा प्रश्न आम्हाला पडत आहे. कुणाची रंगबाजी किंवा हुकूमशाही सहन केल्या जाणार नाही.

**-नितीन हटवार, माजी**
**जिल्हा परिषद सदस्य.**

## लोखंडी बार चोरी प्रकरणातील आरोपी अटक

**अमरावती** - राजापेठ पोलिसांनी लोखंडी बार चोरून नेणार्या एका आरोपीला 23 ऑक्टोबर रोजी अटक केली. अजय मनोज मोरे (21, रा. बेलपुरा, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून चोरी गेलेल्या मालापैकी अंदाजे 18 हजार रुपये किमंतीचा 300 किलो माल जप्त करण्यात आला आहे. फिर्यादी यांची रुक्मीणी नगर भागात बांधकामाची साईट सुरु असुन त्यांच्या साईटवरुन कुणीतरी अज्ञात इसमाने अंदाजे 700 किलो वजनाचे लोखंडी बार चोरुन नेले. या तक्रारीवरून राजापेठ ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. सदरचा गुन्हा दाखल होताच पोलिसांनी संशयित आरोपी अजय मनोज मोरे याला ताब्यात विचारपुस केली. त्यावेळी त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सदर कार्यवाही पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस आयुक्त गणेश, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठचे पोलीस निरीक्षक पुनीत कलट यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## मोबाईलची चोरी करून बॅंक खात्यातील 2.80 लाख उडविले

### मोर्शी बसस्थानकातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 24 )** मोबाईल चोरी केल्यानंतर एका तरुणाच्या दोन बॅंक खात्यांमधून 2 लाख 80 हजार रुपये ऑनलाइन वळती करण्यात आल्याची घटना मोर्शी हद्दीत उघडकीस आली आहे. याप्रकरणी प्रभुदयाल प्रकाशराव चौधरी (43, सुरवाडी, तिवसा) यांच्या फिर्यादीवरून मोर्शी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्रभुदयाल चौधरी हे 18 ऑक्टोबर रोजी काही कामानिमित्त मोर्शी येथे गेले होते. जिथे बसस्थानकातून त्यांचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. दरम्यान, अज्ञात आरोपीने मोबाईलवरून गोपनीय माहितीचा वापर करून व्यवहार केला आणि प्रभुदयाल यांच्या एसबीआय बॅंक खात्यातून 2 लाख 76 हजार 100 रुपये काढून घेतले. नंतर फोन पेद्वारे युनियन बॅंक ऑफ इंडियाच्या खात्यातून 4200 रुपये काढण्यात आले. दोन्ही खात्यातून एकूण 2 लाख 80 हजार 300 रुपये काढण्यात आले. त्यानंतर प्रभुदयाल चौधरी यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. मोर्शी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 66 (सी) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## कॉँग्रेसच्या पहिल्या यादीत या 4 नेत्यांना उमेदवारी

### तिवसा, अमरावती, धामणगाव रेल्वे व अचलपूर कॉँग्रेसच्या नावे






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.24 ) -** धामणगाव रेल्वे मतदारसंघातील जागा वाटपावरुन महाविकास आघाडीचा पेच संपल्यावर गुरुवारी( दि.24) कॉँग्रेस ने जाहिर केलेल्या आपल्या पहिल्या यादीमध्ये अमरावती जिल्ह्यातील 4 कॉँग्रेसी नेत्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले आहे.

धामणगाव रेल्वे मतदारसंघातील महाविकास आघाडीची जागा शिवसेना (उबाठा)करिता सोडण्याची मागणी शिवसैनिकांनी लावून धरली होती. परंतू गेल्या पुर्वीपासून या ठिकाणी कॉँग्रेसचा दावा असल्याने दर्यापूरच्या बदल्यात धामणगाव रेल्वे मतदारसंघातील जागा कॉँग्रेसला सोडण्यात आली. त्यामूळे बळवंत वानखडे खासदार झाल्यानंतर रिकामी झालेल्या दर्यापूर येथील जागेवर आता शिवसेना( उबाठा) आपला उमेदवार लढविणार आहे. तर आता धामणगाव मतदार संघाकरिता कॉँग्रेसकडून माजी आमदार विरेंद्र जगताप, तिवसा मतदारसंघात विद्यमान आमदार यशोमती ठाकुर, अमरावती मतदारसंघात माजी मंत्री डॉ.सुनिल देशमुख तर अचलपूर मतदारसंघात कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# यशोमती ठाकूर सारख्या नेतृत्वाची महाराष्ट्राला गरज- आ. विनेश फोगाट

महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांची नामांकन रॅली ■ सभेला मतदारसंघातील नागरिकांची प्रचंड गर्दी



## तुमची साथ, तुमचा आशीर्वाद हाच माझा विश्वास-यशोमती ठाकूर

तुमचे प्रेम, आशीर्वाद, विश्वास माझी ताकद आहे. कोणत्याही संकटांचा सामना करण्यासाठी तुमची साथ पुरेशी आहे. ही लढाई नुसती निवडणूकी पुरती नसून संविधान वाचविण्यासाठी आहे. विद्यमान सरकारने तुमचा विश्वासाघात केला. शेतीमालाला आजही पंधरा वर्षांपूर्वीचेच भाव आहे. फसव्या योजना काढून भाजप प्रणित सरकारने मतदारांना अमिष दाखविले आहे. आपल्याला कोणत्याही प्रलोभनांना बळी पडायचे नाही. पक्ष व घर फोडण्याचे काम करणाऱ्या लोकांना संविधानाची ताकदच येणाऱ्या काळात दाखवावी लागेल, यासाठी सजग राहून महाविकास आघाडीला भक्कम साथ द्या. विकास करणाऱ्यांच्या पाठीशी राहा. संविधान वाचविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी निवडून आणण्याचे आवाहन तिवसा विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांनी केले.







**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.24 )-** महिलाच नव्हे तर युवकांवर देखील अन्याय करणाऱ्या भाजप प्रणित सरकारला पराभूत करून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार निवडून आणा, यशोमती ठाकूर सारख्या बुलंद व कणखर नेतृत्वाची समाजाला व पर्यायाने महाराष्ट्राला गरज असून या आपल्या बहिणीला हरविण्यासाठी विरोधक षडयंत्र रचतील परंतु आपण कोणत्याही भ्रमात न राहता यशोमती ठाकूर यांचा बुलंद आवाज विधानसभेत पोहचवा असे आवाहन प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आ. विनेश फोगाट यांनी केले.

महाविकास आघाडीच्या उमेदवार लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ आयोजित विराट सभेत आ.विनेश फोगाट बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव, मध्यप्रदेशचे माजी मंत्री सुखदेव पांसे, खा. बळवंत वानखडे, वर्धा येथील खा. अमर काळे, यवतमाळ येथील खा.संजय देशमुख, माजी मंत्री अनिल देशमुख, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, आ. धीरज लिंगाडे, रिपाई गवई गटाचे नेते डॉ. राजेंद्र गवई, बबलू देशमुख, वीरेंद्र जगताप, दिलीप एडतकर, सुनील देशमुख, विलास इंगोले, बबलू शेखावत, जयश्री वानखडे यांचासह इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

महाविकास आघाडीच्या हजारो कार्यकर्ते व मतदारसंघातील नागरिकांच्या उपस्थितीत यशोमती ठाकूर यांनी आज गुरुवारी(दि.24) तिवसा विधानसभा मतदार संघासाठी नामांकन दाखल केले. आ.यशोमती ठाकूर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी महाविकास आघाडी व घटकपक्षाचे हजारो कार्यकर्ते तिवसा येथील समर्थ आडकूजी महाराज नगर सातरगाव रोड येथील मैदानावर जमले होते. प्रारंभी नामांकन रॅली काढून यशोमती ठाकूर यांनी अफाट सभा घेतली.मोठ्या शक्तीप्रदर्शनात त्यांनी आपला नामांकन अर्ज दाखल केला.

यावेळी पुढे बोलतांना विनेश फोगाट म्हणाल्या की,यशोमती ठाकूर या बहादूर बेटी व बहीण आहे. यशोमतींचा आवाज म्हणजे तुमचा आवाज. यशोमती ठाकूर सारख्या महिला निर्माण झाल्यास महिलांवर अत्याचार होणार नाहीत असा विश्वास आ.फोगाट यांनी व्यक्त केला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव यांनी केंद्र सरकार सोबतच राज्य सरकारचा समाचार घेत यशोमती ठाकूर सारख्या जनतेच्या पाठीराख्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी निवडून देण्याचे आवाहन नागरिकांना केले. यावेळी माजी मंत्री सुखदेव पांसे यांनी यशोमती सारख्या विकासाभिमुख नेतृत्वाची आज गरज असल्याचे म्हटले. यावेळी त्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला.

यावेळी खा.अमर काळे यांनी देखील आपले विचार व्यक्त केले.भाजपा व महायुतीच्या उमेदवारांची लोकसभेत कशी दयनीय अवस्था झाली याची सर्वांनाच कल्पना आहे त्याची धास्ती घेऊन विद्यमान सरकारने अनेक योजनांचे प्रलोभन जनतेला दाखविले. अश्या फोकनाड सरकारला खाली खेचण्याची वेळ आली असून आता महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होणार असा आशावाद महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी बोलतांना खा. बळवंत वानखडे यांनी म्हटले की, यशोमती ठाकूर यांनी तिवसा विधानसभा मतदार संघात विकासाची गंगा आणली. त्यांनी विविध विकासकामे करून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात देखील आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. यशोमती ठाकूर यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणावे असे आवाहन यावेळी खा.बळवंत वानखडे यांनी केले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तक्रार बुकातील पान फाडून गायब केल्याच्या प्रकरणात चौकशी सुरू


## आगार व्यवस्थापक जयंत झाडे यांची माहिती



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 24 )–** एसटी बस किंवा कर्मचाऱ्यांशी संबंधित तक्रार करण्याकरिता अथवा काही सूचना देण्याकरिता प्रत्येक एसटी आगारात तक्रार व सूचना बुक राहते. मात्र सदर बुक मध्ये एका प्रवाशाने तक्रार दिली असता सदर तक्रार लिहिलेले बुकचे पान फाडून ते पान गायब केल्याचा धक्कादायक प्रकार चांदूर रेल्वे आगारात नुकताच उघडकीस आला. या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याची माहिती चांदूर रेल्वेचे आगार व्यवस्थापक जयंत झाडे यांनी गुरूवारी (ता. 24) दिली.

चांदूर रेल्वे वरून अनेक विद्यार्थी, युवक – युवती हे शिक्षणाकरिता, नोकरी करिता एसटी बसने धामणगावला येणे – जाणे करतात. अशातच धामणगाव रेल्वे येथील आदर्श महाविद्यालयासमोर एसटी बसचा नेहमीच थांबा असतो, मात्र गेल्या काही दिवसांपासून या ठिकाणी काही एसटी बसचे चालक हे एसटी न थांबवता सुसाट घेऊन जात आहे. अशातच प्रवासी अश्विनी विश्वकर्मा यांनी आदर्श महाविद्यालयासमोर एसटी बसचे चालक, वाहक बस थांबवित नसल्याची तक्रार 23 सप्टेंबरला एसटी आगारातील तक्रार वहीत तक्रार नोंदवली होती. मात्र यावर कुठलीही कारवाई झाली नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा 21 ऑक्टोंबर रोजी याविषयी दुसरी तक्रार नोंदविली. यावेळी त्यांनी 23 सप्टेंबरला केलेल्या तक्रारीची स्थिती पाहण्याकरिता तक्रार बुकातील पान मागे पलटविले असता यावेळी सदर पान तक्रार बुकातून फाडलेले दिसून आले. यावरून कर्मचारी हे परस्परच तक्रार असलेले पान गायब करीत असल्याचे उघड झाले. मात्र प्रवाशांच्या तक्रारीवर आगारातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे यावरून दिसून आले आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषी चालक, वाहक अथा इतर कर्मचारी यांच्यावर योग्य कारवाईची




मागणी प्रवासी अश्विनी विश्वकर्मा यांनी केली आहे. तर यावर प्रतिक्रीया देतांना आगार व्यवस्थापक जयंत झाडे यांनी म्हटले की, 21 ऑक्टोंबरला बसमध्ये 100 च्या वर प्रवासी असल्याने त्यांनी बस थांबविली नाही. तसेच तक्रार पुस्तकातील पान फाडल्याच्या प्रकरणात चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आता या प्रकरणात ठोस कारवाई आगार व्यवस्थापकांमार्फत होणार का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### तक्रार दिली म्हणून बस थांबवित नाही ?

सप्टेंबर महिण्यात थांब्याविषयी तक्रार दिली म्हणून संबंधित वाहक जाणून आदर्श महाविद्यालयासमोर बस थांबवित नसल्याची चर्चा प्रवाशांतून ऐकावयास येत आहे. तसेच तक्रारीचे पान गायब करणारा तो कर्मचारी कोण ? याचा सुगावा लागणे गरजेचे आहे. अन्यथा आगारातील तक्रार बुकाला किंमत राहणार नाही ऐवढे मात्र नक्की.

# वडीलांच्या उपस्थितीत अभिजीत अडसूळांनी भरले नामांकन

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर( दि.24 )–** दर्यापूर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी गुरुवारी(दि.24) शिवसेना(शिंदे गट)कडून आपले आपले नामांकन निवडणूक आयोगाकडे दाखल केले. यावेळी वडील माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ यांच्यासह माजी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे, गजानन वाकोडे, रवींद्र गणोरकर, गोपाल अरबट तसेच महीला–पुरूषांसह शिवसैनिक आदी उपस्थित होते.

अभिजीत अडसूळ यांनी माहेश्वरी भवन लगतच्या प्रचार कार्यालयापासून ते नवीन तहसील कार्यालयापर्यंत शक्तीप्रदर्शन करीत निवडणूक निर्णय अधिकारी राजेश्वर हांडे यांच्याकडे 2 उमेदवारी अर्जे



दाखल केले. आपला विजया ठाम विश्वास यावेळी अडसूळांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

# हिवरखेडमध्ये मतदान जागृती अभियान

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.24 )–** येथील सर्वोदय शिक्षण समिती द्वारा संचालित महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार दि. 22 ऑक्टोबरला मतदान जागृती अभियान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी उज्वला ढोले मॅडम (गटविकास अधिकारी, पं. स. मोर्शी) प्रमुख पाहुणे म्हणून गायकवाड (शिक्षण विस्तार अधिकारी पं. स.मोर्शी), समीर चौधरी (कक्ष अधिकारी,मोर्शी), सुरेंद्र वानखडे (केंद्रप्रमुख दापोरी तथा शिक्षण विस्तार अधिकारी, पं.स. मोर्शी), इंगळे (प्रशासन अधिकारी पं.स. मोर्शी), प्रा. चिंचमलातपूरे, (नवोदय कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड) उपस्थित होते.

सर्व प्रथम सर्व मान्यवर अतिथींचे पुष्पगुच्छाने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी मतदान जागृती चे महत्व पटवून देतांना मतदार हा जागृत असणे काळाची गरज आहे. जेणेकरून योग्य उमेदवाराची निवड करता येईल.




भारतासारख्या मोठ्या लोकशाही राष्ट्रांमध्ये राष्टविकास हा मतदारांच्या हाती आहे म्हणूनच राज्य विधिमंडळात योग्य उमेदवार निवडून देण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने भारतीय जनतेची आहे. परंतु हे करतांना जनतेने उमेदवारांची सामाजिक बांधिलकी व विकास कार्य लक्षात घेऊनच त्यांना निवडून द्यावे. यासाठी मतदार जागृत होणे गरजेचे आहे आणि ही मतदारातील जागृती आजचा विद्यार्थी वर्ग युवा वर्ग उत्तमरीत्या निर्माण करू शकतो म्हणूनच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनतेत मतदानाचे महत्त्व पटवून देण्याचा मानस पूर्ण होऊ शकतो. अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाला आमचे महाविद्यालयातील 11–12 विचे विद्यार्थी तसेच नवोदय कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी गावातील लोकांमधे मतदान जागृती करतांना मतदार राजा, जागा हो! भारतीय लोकशाहीचा, धागा हो! अशा घोषणांच्या माध्यमातून जागृती करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाला हिम्मतराव खवले यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. सुभाष पारीसे यांनी केले.

# कोकर्डा येथील अनुराधा गव्हाळे नेट परीक्षा उत्तीर्ण

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.24 )–** यूजीसीने नुकताच नेट परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. कोकर्डा येथील रहिवासी असलेल्या अनुराधा शेषराव गव्हाळे यांनी राज्यशास्त्र विषयात नेट परीक्षा सर्वसाधारण गटातून उत्तीर्ण केली आहे. शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती येथून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पदवित्तरचे शिक्षण आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे येथून घेत आहे. पदवीच्या प्रथम वर्षाला युजीसी नेट ही परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आहे. अनुराधाने 300 पैकी 176 गुण मिळवत 83.24 टक्के गुण मिळविले. राज्यशास्त्र विषयात पीएचडी करून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा आपला उद्देश असल्याचे अनुराधा हिने सांगितले. या यशाबद्दल अभिनंदन करताना आई वर्षा गव्हाळे, वडील शेषराव गव्हाळे, बहीण विशाखा गव्हाळे आदींनी सांगितले की, अनुराधाने कुटुंब, समाज आणि गावाचा गौरव केला आहे.अनुराधा नेट परीक्षा उत्तीर्ण होताच कोकर्डा येथील सर्वोदय हायस्कुल मधील कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक, शिक्षकांनी सत्कार केला. त्याचबरोबर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# महायुतीचे उमेदवार प्रविण तायडे आज भरणार उमेदवारी अर्ज

## जुळ्या शहरातून दुचाकी रॅली काढत शक्तीप्रदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.24 )–** अचलपूर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार प्रविण तायडे उद्या शुक्रवारी (25) भाजपकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. याकरिता अचलपूर–परतवाडा या जुळ्या शहरातून भव्य अशी दुचाकी रॅली काढत शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.



शुक्रवारी सकाळी 11 वाजता अचलपूर येथील सरमसपुरा स्थित जगदंबा देवी संस्थानापासून दुचाकी रॅली काढत, अचलपूर ते परतवाडा येथील जयस्तंभ चौक येथे रॅलीचा समारोप करण्यात येईल, त्यानंतर जयस्तंभ चौकातून पायदळ रॅली उपविभागीय अधिकारी कार्यालयावर पोहोचेल तेथे प्रविण तायडे यांच्या नेतृत्वात पाच लोकांचे शिष्टमंडळ आतमध्ये जावून नामांकन अर्ज सादर करतील.

# गावठी दारूचा 85 हजाराचा मुद्देमाल जागीच केला नष्ट

## मोर्शी व मुलताई मध्यप्रदेश पोलिसांनी संयुक्त कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )–** मोर्शी पोलिसांनी गावठी हातभट्टी दारु अड्डयावर धाड टाकून 85 हजारांचा मुद्देमाल जागीच नष्ट करण्यात आला. सदर कारवाई होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मोर्शी व मुलताई मध्यप्रदेश पोलिसांनी संयुक्तरित्या केली.

महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवर असलेल्या घनदाट जंगलात मोठ्या प्रमाणावर अवैध गावठी दारू काढण्याचा गोरखधंदा कित्येक दिवसांपासून सुरू आहे. महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवरील झुनकारी परिसरात मोठया प्रमाणात गावठी मोहाच्या हातभट्टीची दारु काढून ती महाराष्टात विक्रीसाठी आणल्या जाते. अशी गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली. त्या अनुषंगाने आज (ता.24) अमरावतीचे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, मुलताई पोलिस स्टेशनचे ठाणेदार राजेश सारतकर, पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार, अमोल बुरकुल, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतुलाल ऊईके, पो.कॉ.सचिन भाकरे, पो.कॉ.छत्रपती करपते, पो.कॉ.स्वप्नील बायस्कर, चालक सुहास उमाळे तसेच पो.स्टे. मुलताई अतंर्गत मासोद पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक बसंत कुमार आहाके यांनी पो.स्टे.मुलताई हद्दीतील ग्राम झुनकारी येथील जंगल परिसरात नदीचे काठावर असलेल्या गावठी हातभटटी दारु गाळण्याचे ठिकाणावर छापा मारुन 200 लिटर क्षमतेचे 4 ड्रममध्ये असलेला मोहा सडवा कि.अं. 80 हजार रुपये व 5 हजार रुपयाचे दारु गाळण्याचे साहित्य असा एकूण 85 हजार रुपयाचा मुद्देमाल घटनास्थळीच नष्ट केला. या धाडसी कार्यवाहीमुळे अवैध दारू काढणाऱ्यांचे व विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या दिवाळीचा उत्सव व होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही प्रकारची दारू विक्रीसाठी आणल्या जात असेल तर त्या आरोपीवर कठोरात कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# 60 लाखात विकला जिल्ह्यातील वनविभाग?

## शिट्टी, पुंगी, डफळे वाजवून वण्यप्राणी पकडण्याचे द्रविडी प्राणायम

### जंगले वाऱ्यावर सोडून विमानतळ परिसरात हुई रे हुई










**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )–** बेलोरा विमानतळ परिसरातील वण्य प्राणी बाहेर काढण्याकरिता विमानतळ प्राधिकरणाने वनविभागाला 60 लाख रुपयांमध्ये करार केल्याची माहिती आहे. परंतू या 60 लाखात जिल्ह्यातील संपुर्ण वनविभाग विकल्या गेला की काय ? असे वाटायला लागले आहे. जिल्ह्यातील जंगले वाऱ्यावर सोडून सर्व अधिकारी, कर्मचारी व मजूर विमानतळ परिसरात वण्य प्राण्यांमागे 'हुई रे हुई' करत गुंतलेले दिसत आहे. गेल्या तीन महिन्यांपासून सुरु असलेल्या या मोहिमेमध्ये वनविभागाला बोटावर मोजण्याइतके वण्यप्राणी पकडले. वनविभागाचा ताफा शिट्टी, पुंगी, डफळे घेवून प्राणी पकडण्याचे द्रविडी प्राणायम करताना दिसत आहे.

बेलोरा विमानतळाच्या जवळपास 200 एकर परिसरात हरिण, नीलगाय, रानडुक्कर, मोर यांसारखे शेकडो वण्यप्राणी अधिवासीत आहेत. बेलोरा विमानतळावरील धावपट्टीवर वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या अपघाताची शक्यता पाहता यांना पकडण्याकरिता भारतीय विमानतळ प्राधिकरणाने 60 लाख रुपयांमध्ये वनविभागाशी करार केला आहे. परंतू याआधी एवढ्या मोठ्या संख्येने प्राण्यांना पकडण्याची वेळ कधी स्थानिक वनविभागावर आली नसल्याने. वनविभागातील अधिकाऱ्यांकरिता या वण्यप्राण्यांना पकडणे 'द्रविडी प्राणायम' ठरत आहे. या वन्यप्राण्यांना विमानतळ परिसरातून बाहेर काढण्यासाठी वाय आकाराचे कुंपण तयार करुन 'बोमा' पद्धतीचा वापर केला जात आहे. परंतू वण्यप्राण्यांना या 'बोमा' ट्रॅप मध्ये पकडण्यात वनविभाग 'फेल' ठरत आहे.

### वनकर्मचारी, वनमजूरांच्या सुरक्षेचे तीनतेरा

या वण्यप्राण्यांना पकडताना वनकर्मचारी, वनमजूरांच्या सुरक्षेचा कुठलाच विचार करण्यात आलेला नाही. तोंडात शिट्टी आणि हातात डफळी ऐवढ्याच आयुधावर वनविभागाचे अधिकारी या आकाराने मोठ्या असलेल्या प्राण्यांना पकडण्याचा प्रयत्न करित आहे. बारशिंगे, हरणं, रानडूक्कर आणि निलगाय सारखे वण्यप्राणी वनकर्मचाऱ्यांच्या डोक्यावरुन उडी घेवून जात आहेत. ज्यामूळे यांना पकडताना आतापर्यंत अनेक कर्मचारी व वनमजूर किरकोळ जखमी झाले आहे. दोन दिवसांपुर्वी यामध्ये एका वनमजूराचा हात तुटल्याने त्याच्या हातावर शस्त्रक्रियासुध्दा करावी लागली.

### प्राणी पकडताहेत की, त्यांच्यावर अत्याचार करताहेत

वन कायद्यानुसार जंगलामध्ये वण्यप्राण्यांना त्रास होईल असे कुठलेही कृत्य करता येत नाही. परंतू येथे बेलोरा परिसरात वनविभागच वण्यप्राण्यांवर अत्याचार करताना दिसत आहे. प्राणी पकडतांना डफळे, शिट्टी, पुंग्या, वाहनांचे हॉर्न वाजवून त्यांना चिथावणी देत आहे. याप्रकारामूळे भयभीत झालेले प्राणी आपल्या जीवाची पर्वा न करता सैरावरा पळत आहे, यामध्ये अनेक प्राणी जखमी झाल्याचेही माहिती आहे.

### खासगी कामाला सरकारी कर्मचारी

विमानतळ प्राधिकरणाने वण्यप्राणी पकडण्याकरिता वनविभागाशी 60 लाखांचा करार केला आहे. हे 60 लाख घश्यात घालता यावे, याकरिता वण्यप्राणी पकडण्याकरिता प्रशिक्षीत संस्था, किंवा खासगी प्रशिक्षीत लोकांचा वापर न करता वनविभाग आपल्याच सरकारी कर्मचाऱ्यांना जुंपत आहे. सकाळी 6 वाजताची रिपोर्टींग केल्यानंतर नास्त्यात एक प्लेट उपमा आणि दुपारी खिचडी ऐवढ्याच जेवणावर या कर्मचाऱ्यांना 12 तास वापरुन घेतले जात आहे.

# एस.टी. बसमध्ये विनयभंग करणाऱ्या वाहकाला अटक

- मुलींचा व्हीडीओ काढून सोशल मीडियावर केला होता प्रसारीत
- नया सावंगा ते चांदूर रेल्वे दरम्यानची घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 24 )–** एस.टी. बसमध्ये वाहकाकडून अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी 11 ते 12 वाजताच्या सुमारास नया सावंगा ते चांदूर रेल्वे दरम्यान घडली. वाहकाने सदर अल्पवयीन मुलींचा व्हीडीओ काढून सोशल मीडियावर प्रसारीत सुध्दा केला. या प्रकरणातील आरोपी वाहक अंकित काशिराम साहू (42 वर्ष, रा. अमरावती) याला बुधवारी चांदूर रेल्वे पोलीसांनी अटक केली असुन त्याची जेलमध्ये रवानगी सुध्दा झाली आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, फिर्यादी (वय – 42 वर्ष) यांची अल्पवयीन मुलगी ही तिच्या अल्पवयीन मैत्रिणींसह कॉलेजमध्ये अमरावती ते चांदूर रेल्वे बस मध्ये येत असतांना आरोपी वाहक अंकित साहू याने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचा हात पकडून व इतर मूलींना सुध्दा वाईट उद्देशाने हात लावला. तसेच मुलींच्या चेहऱ्यावर बांधलेला कपडा सुद्धा काढल्याचा आरोप आहे. याशिवाय सर्व मुलींना बसमध्ये मागे एका ठिकाणी आणून सर्वांचा व्हिडीओ काढला. बस एस.टी. डेपो, चांदूर रेल्वे येथे येताच आरोपी अंकित साहू याने आरोपी क्र. 2 सुभाष मानकर याला बोलाविले. दोन्ही आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीच्या मुलीचा विनयभंग केला. व आरोपी अंकित शाहू याने फिर्यादीच्या मुलीचा व तिच्या मैत्रिणींचा काढलेला व्हिडीओ प्रसार माध्यमातून प्रसारीत करून सर्व मुलींची बदनामी केली. या प्रकरणात अंकित साहू याला चांदूर रेल्वे पोलीसांनी अटक करून बुधवारी अमरावती येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावून त्याची अमरावती कारागृहात रवानगी केली आहे. तर दुसरा आरोपी सुभाष मानकर याला अटक होणे बाकी आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय विना पंडे करीत आहे. तर वाहतुक नियंत्रकाला मारहाण केल्याच्या प्रकरणातील आरोपी सुध्दा फरारीत असुन पोलीसांकडून शोध सुरू आहे.